**<u>नि.फौ.ख.क्र.५७/२०२३</u>**
शासन–वि–बाबुराव चव्हाण
**नि.क्र.३६.**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ यांची जबानी</u>**

मी याद्वारे सत्य प्रतिज्ञेवर कथन करते की,
नाव – मारूती सुखदेव तिकुटे,
वय – ४८ वर्षे, व्यवसाय – गवंडी,
राहणार– केडगाव, ता. दौंड, जि. पुणे.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. पी. आधंळे यांच्यामार्फत शपथेवर सुरुः</u>–**

१. वादातील घटना दि. ०५.०६.२०२२ रोजी दापोडी येथे सकाळी ११.३० वाजता शिवाजी चव्हाण यांच्या घराचे काम चालू होते त्या ठिकाणी घडली होती. मी त्या ठिकाणी गवंडी काम करत होतो. काम करत असताना मला भांडणाचा आवाज आला म्हणून मी त्या ठिकाणी गेलो असताना शिवाजी चव्हाण आणि बाबुराव यांच्यामध्ये भांडण चालू असल्याचे दिसले. त्यावेळी बाबुराव चव्हाण याने शिवाजी चव्हाण यांना वीट डोक्यात मारली. त्यानंतर त्यांचे घरचे मधे पडून शिवाजी चव्हाण यांना दवाखान्यात घेऊन गेले. ज्याने मारहाण केली त्याला पाहिल्यास ओळखु शकते. आरोपी आज न्यायालयात हजर नाही. आरोपीची ओळख आव्हानित न करण्याच्या अटीवर त्याची गैरहजेरी माफ करण्यात आलेली आहे. ज्या विटेने मारहाण झाली ते पाहिल्यास ओळखू शकतो. आता मला दाखविण्यात आलेला आर्टीकल बी वरील वीट तीच आहे.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. पी. डी. खंडागळे यांच्यामार्फतः</u>–**

२. माझ्यात आणि शिवाजी चव्हाण यांच्यामध्ये बांधकामाबाबत तोंडी करारनामा झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, लेखी करार झाला नव्हता. मी केडगाव येथे राहतो आणि त्या दिवशी कामाला ९.३० वाजता आलो होतो. मी दोन वर्षापासून फिर्यादीला ओळखतो. पोलीसांनी माझ्यासमक्ष पंचनामा केला नव्हता. फिर्यादी आणि आरोपी यांच्यामध्ये पूर्वीपासून जागेवरुन वाद असल्याचे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीशी माझे व्यावसायिक संबंध असल्यामुळे मी त्यांना मदत व्हावी म्हणून खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत.

समक्ष

Sd/-

**[ श्रीमती एस. ए. विराणी ]**

दिनांकः- ०२.०४.२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,  दौंड, जि. पुणे.